श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके ,ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पाडळी दर्या ता.पारनेर यांना पदावरुन तात्पुरते दूर करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
ग्रामपंचायत विभाग
आदेश क्र.साप्रवि-२/ग्रापं-३/४४६/२०२६
दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद केलेप्रमाणे

संदर्भ:-१. गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांचेकडील पत्र क्र.आस्था-२/१०३७/२६, दि.०८/०९/२०२६.
२.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चा नियम ३
३.महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३

ज्याअर्थी श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पाडळी दर्या ता. पारनेर यांनी ग्रामंपचायत कार्यालयीन कामकाजात हलगर्जीपणा व कर्तव्यात कसुर करुन गैरवर्तन केलेले आहे. पंचायत समिती स्तरावरील कार्यालयात आढावा बैठकीमध्ये अनाधिकृतपणे गैरहजर राहणे, ग्रामपंचायत दप्तर अद्यावत न ठेवणे, तसेच ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरहजर राहणे, आर्थिक अनियमितता करणे या बाबी निदर्शनास आलेल्या आहे. जिल्हा परिषद कर्मचा-याने सदैव निरपराद, सचोटीने वागणे व कर्तव्यपरायण असणे आवश्यक आहे. तथापि, श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांनी ग्रामपंचायत कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेले आहे. कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम ३ चा भंग केलेला आहे.

त्याअर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम क्र.३ मध्ये दिलेल्या तरतूदीस अधीन राहून मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी मुख्य कार्यकारी अधिकारी तथा शिस्तविषयक प्राधिकरण जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाव्दारे श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पाडळी दर्या ता.पारनेर यांचे विरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही सुरु व अनिर्णित असल्याने यांना सदर आदेशाच्या दिनांकापासून जिल्हा परिषद सेवेतून ग्रामपंचायत अधिकारी या पदावरुन सेवानिलंबीत करीत आहे.

आणखी, असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश अंमलात राहील तेवढया कालावधीत श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांचे मुख्यालय पंचायत समिती ----राहुरी---- येथे राहिल आणि श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांना सेवानिलंबन कालावधीत देण्यात आलेल्या मुख्यालयातील तालुक्याचे गटविकास अधिकारी पंचायत समिती यांच्या पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.

श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन,बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतूदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावेत. निलंबनाच्या कालावधीत श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये. त्यांनी तसे केल्यास त्या बाबतचे पुरवणी दोषारोप त्यांचेवर ठेवण्यात येतील. तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

निलंबनाचे कालावधीत, श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबन निर्वाह भत्ता जेंव्हा जेव्हा देण्यात येईल त्या त्या वेळी आपण खाजगी नोकरी स्विकारली नाही अथवा कोणताही

खाजगी धंदा व व्यवसाय करीत नाही, अशा आशयाचे प्रमाणपत्र श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांनी त्यांना सेवानिलंबीत करुन दिलेल्या मुख्यालयाचे तालुक्याचे गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना सादर करावे.

निलंबनाचे कालावधीत श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांना निलंबन निर्वाह भत्ता देण्याबाबतची कार्यवाही सेवानिलंबीत करुन देण्यात आलेलया मुख्यालयाचे गटविकास अधिकारी पंचायत समिती .राहुरी..... हे करतील.

या आदेशाची नोंद श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मूळ सेवापुस्तकामध्ये घेण्यात यावी. सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक २०२६१०२८०६०२०५ असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 28-10-2026 14:47:57
आनंद भंडारी (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत पाडळी दर्या ता.पारनेर

व्दारा व प्रत :- गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर

प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर,जि.अहिल्यानगर.

२/-सदर सेवा निलंबन आदेश श्री सुशिलकुमार ओमनाथ शेळके, ग्रामपंचायत अधिकारी यांना तात्काळ बजावून दिनांकीत स्वाक्षरी घेण्यात यावी व सदरची प्रत उलट टपाली या कार्यालयास विना विलंब सादर करावी.

प्रत- गटविकास अधिकारी पंचायत समिती ---राहुरी--- जि.अहिल्यानगर

प्रत- मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहिल्यानगर.

प्रत- निवड नस्ती